(इंग्रजी भाषेत टंकलिखित न्यायानिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद.)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमद्धे**

**नागपूर खंडपीठ, नागपूर**

**फौजदारी रिट याचिका क्रमांक ८७७/२०२४**

श्री. संदीप, हरीश केवलानी यांचा पुत्र,

वय अंदाजे - , धंदा - व्यवसाय,

रा. प्लॉट क्रमांक २४, गोकुळपेठ,

कॅनॉल रोड, नागपूर . ....याचिकाकर्ते

:: विरुद्ध ::

महाराष्ट्र राज्य,

आपल्या अधिकाऱ्यामार्फत,

सीबीआय (केंद्रीय अन्वेषण विभाग) ची आर्थिक गुन्हे शाखा,

मुंबई. ..... उत्तरवादी.

==========================================

श्री. ए.एस.केसरी, याचिकाकर्त्याचे वकील

श्री. पी. साथियानाथन, उत्तरवादीचे वकील.

==========================================

**न्यायमंच : न्या. उर्मिला जोशी-फाळके**

**सुनावणी समाप्तीचा दिनांक : ०२/०१/२०२५**

**अधिघोषित केल्याचा दिनांक : ०८.०१.२०२५**

**न्यायनिर्णय :**

या याचिकेद्वारे याचिकाकर्त्याने खालील अनुतोषांची मागणी केली आहे.

१. विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी विशेष प्रकरण क्र.३/२०१७ मधील निशाणी - २७३ वर दिलेला दिनांक ११.०३.२०२४ रोजीचा आदेश मनमानी, बेकायदेशीर, तारतम्यहीन आणि कायद्याच्या प्रस्थापित तत्त्वांच्या विरोधात असल्या न तो रद्द करण्यासाठी योग्य रिट/आदेश/निर्देश जारी करणे, आणि

२. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०२ मधील तरतुदींचा वापर करून उत्तरवादी प्राधिकारी पासपोर्ट जप्त करू शकत नाही , असे ठरविण्यासाठी आणि घोषित करण्यासाठी योग्य रिट / आदेश / निर्देश जारी करणे आणि पासपोर्ट जप्त करण्याचा उत्तरवादीचा अधिकार मनमानी, बेकायदेशीर आणि तारतम्यहीन आहे आणि उत्तरवादी प्राधिकरणाला पासपोर्ट मुक्त करण्याचे आणि याचिकाकर्त्याकडे सुपूर्द करण्याचे निर्देश देतो.

२. याचिकाकर्त्याच्या वतीने विद्वान वकील श्री ए. एस. केसरी आणि उत्तरवादी-प्राधिकरणातर्फे विद्वान वकील श्री. पी. साथियानाथन यांचे म्हणणे ऐकले. पक्षकारांची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलांच्या संमतीने याचिका अंतिम सुनावणीसाठी घेतली.

३. याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांनी सादर केले की, याचिकाकर्ते बॉलीवूडमध्ये लेखक आणि दिग्दर्शक म्हणून चित्रपट उद्योगाशी संबंधित आहेत आणि एक उद्योगपती देखील आहेत. त्यांच्या विरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० आणि १२० (बी) आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम १३ (२) आणि १३ (१) (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २०१३ ते २०१६ या कालावधीत आरोपींनी इतर सहआरोपींसह बँकेची फसवणूक केल्याच्या आरोपावरून बँक ऑफ बडोदा, प्रादेशिक कार्यालय, नागपूरचे उपमहाव्यवस्थापक यांनी त्यांच्यासह अन्य आरोपींविरुद्ध २.६.२०१७ च्या लेखी तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. अभियोग पक्षानुसार, आरोपी क्रमांक एक हा एस.के. ट्रेडर्सचा मालक असून त्याने इतर सहआरोपींसह बँक ऑफ बडोदाशी संपर्क साधला आणि व्यवसायासाठी ३०० लाख रुपयांची पत कर्ज सुविधा मिळवली. त्यानंतर ३०.६.२०१६ रोजी कर्ज खात्याचे अनुत्पादक मालमत्तेत रूपांतर करण्यात आले. आरोपींनी फसवणुकीने आणि बेईमानीने पत कर्ज सुविधा वळविल्याचे तपास यंत्रणेसमोर उघडकीस आले आणि बँकेची अन्याय हांनी केली. तपासादरम्यान याचिकाकर्त्याचा पासपोर्ट जप्त करण्यात आला .

याचिकाकर्त्याच्या युक्तिवादानुसार, व्यवसायासाठी त्याला विविध देशांमध्ये जावे लागते. उत्तरवादी प्राधिकरणाने अनधिकृतपणे हा पासपोर्ट जप्त केला . वस्तुतः फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०२ अन्वये तरतुदींचा वापर करून संबंधित पासपोर्ट जप्त करण्याचा आणि अडकवून ठेवण्याचा उत्तरवादी प्राधिकरणाला कोणताही अधिकार नाही. पासपोर्ट अधिनियम, १९६७ चे कलम १० (३) (इ) ही एक विशेष तरतूद आहे आणि पासपोर्ट जप्त करणे हे केवळ या कलमांतर्गत पासपोर्ट प्राधिकरणच करू शकते आणि म्हणूनच पासपोर्ट जप्त करणे आणि अवरुद्ध करणे हे बेकायदेशीर कृत्य आहे आणि म्हणून ते रद्द होण्यास पात्र आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाला पासपोर्ट मुक्त करण्याचे निर्देश देण्यासाठी याचिकाकर्त्याने केलेला अर्ज खालील विद्वान न्यायाधीशांनी बेकायदेशीरपणे फेटाळला आहे आणि त्यामुळे सदर आदेश रद्द करण्याची गरज आहे.

४. आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ याचिकाकर्त्याच्या विद्वान वकीलांनी कर्नाटक उच्च न्यायालयाच्या प्रवीण सुरेंद्रन विरुद्ध कर्नाटक राज्य आणि अन्य[1] प्रकरणातील निर्णयावर भरवसा ठेवला आहे.

---

1 2022 एससीसी ऑनलाईन कर 1661

५. उत्तरवादी प्राधिकरणाच्या विद्वान वकिलांनी याचिकेला कडाडून विरोध केला आणि सादर केले की खालील विद्वान न्यायाधीशांनी याचिकाकर्त्यास परदेशात जाण्याची परवानगी दिली आहे. जोवर परदेशात जाण्याच्या पुढील परवानगीचा संबंध आहे, याचिकाकर्ते प्राधिकरणाकडे कडे जाऊ शकतात आणि प्राधिकरण त्यावर पुनर्विचार करू शकते. त्यामुळे ही याचिका विफल ठरते आणि ती निकाली निघण्यास पात्र ठरते. संहितेच्या कलम १०२ मधील तरतुदींचा वापर करून पोलिसांना पासपोर्ट जप्त करण्याचे अधिकार आहेत, असा पुढे युक्तिवाद ही करण्यात आला आहे.

६. याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांचा पहिला आणि प्रमुख युक्तिवाद असा आहे की उत्तरवादी प्राधिकरणाला याचिकाकर्त्या विरुद्ध दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने पासपोर्ट जप्त करण्याचे अधिकार नाहीत. पासपोर्ट जप्त करण्याचे अधिकार पासपोर्ट अधिनियमा अंतर्गत केवळ पासपोर्ट अधिकाऱ्यांना आहेत आणि तो विशेष कायदा असल्याने उत्तरवादी प्राधिकरणाने पासपोर्ट जप्त करणे आणि तो ताब्यात ठेवणे हे पासपोर्ट अधिनियमातील तरतुदींच्या विपरीत आहे, ज्यामुळे याचिकाकर्त्यास मुक्तपणे परदेशात प्रवास करण्यापासून वंचित ठेवले जाते आणि त्यामुळे त्याच्या मूलभूत अधिकारांवर परिणाम होतो.

७. पक्षकारांची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलांनी केलेल्या सादरीकरणाचा योग्य विचार करून, हे पाहावे लागेल की उत्तरवादी प्राधिकरणाने पासपोर्ट चार आठवड्यांपेक्षा

जास्त कालावधीसाठी जप्त केल्यानंतर तो पोलिस किंवा उत्तरवादी प्राधिकरणाकडून अडकवून ठेवला जाईल की नाही. सध्याच्या प्रकरणात पासपोर्ट जप्त करणे हे संहितेच्या कलम १०२ अंतर्गत अधिकारांचा वापर करून केले जाते आणि संहितेच्या कलम १०४ च्या अनुषंगाने पासपोर्ट न्यायालयाद्वारे अवरुद्ध केला जातो. पासपोर्ट जारी करणे आणि ते जप्त करणे हे विशेष कायद्या अंतर्गत म्हणजेच पासपोर्ट अधिनियमांतर्गत आहे. पासपोर्ट अधिनियमाच्या कलम १० च्या पोटकलम (३) अन्वये पासपोर्ट अधिनियमाच्या कलम १० च्या पोटकलम (३) मध्ये नमूद अटींच्या अधीन राहून पासपोर्ट किंवा प्रवास दस्तऐवज अडकवून ठेवण्याचा किंवा अडकवून ठेवण्याची तजवीज करू शकणारा किंवा रद्द करण्याचा अधिकार पासपोर्ट प्राधिकरणाला देण्यात आला आहे. पासपोर्ट अडकवून ठेवण्याची अशीच एक अट म्हणजे, जर पासपोर्टधारकाने केलेल्या गुन्ह्या बाबतची कार्यवाही भारतातील फौजदारी न्यायालयात प्रलंबित असेल. त्यामुळे या अधिनियमांतर्गत जप्त करण्याऱ्या प्राधिकरणाचे म्हणजेच सक्षम प्राधिकरणाचे अधिकार अधिनियमाच्या कलम १० च्या पोटकलम (३) च्या खंड (इ) मध्ये दर्शविले आहे, जे प्रस्तुत प्रकरणास लागू असलेली एकमेव तरतूद आहे. पासपोर्ट अधिनियम हा एक विशेष अधिनियम आहे आणि तो विशेष कायदा असल्याने तो संहितेच्या कलम १०२ किंवा कलम १०४ वर वरचढ _होईल ज्यामुळे पोलिसांना जप्त करण्याचा आणि न्यायालयाला कोणताही दस्तऐवज अवरुद्ध करण्याचा अधिकार आहे.

या अधिनियमाच्या कलम १० च्या पोटकलम (३) (इ) नुसार पासपोर्ट धारकाने किंवा प्रवासपत्राच्या धारकाने जो अपराध केल्याचे अभिकथन करण्यात आले आहे अशा एखाद्या अपराधाबाबतची कार्यवाही भारतातील फौजदारी न्यायालयात प्रलंबित असल्यास पासपोर्ट अडकवून ठेवण्याची तरतूद आहे.

८. संहितेच्या कलम १०२ नुसार पोलिस अधिकाऱ्याला अशी कोणतीही मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत जी चोरीला गेल्याचे अभिकथन करण्यात आले असेल किंवा तसा संशय असेल किंवा ज्या परिस्थितीमुळे कोणताही अपराध करण्यात आल्याचा संशय निर्माण होतो अशा परिस्थितीत ती सापडली आहे. संहितेच्या कलम १०४ नुसार न्यायालयासमोर सादर केलेली कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू जप्त करण्याचा अधिकार न्यायालयाला देण्यात आला आहे. संहितेच्या कलम १६५ च्या पोटकलम (५) मध्ये अशी तरतूद आहे की पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) अन्वये केलेल्या नोंदीच्या प्रती गुन्ह्याची दखल घेण्याचे अधिकार असलेल्या जवळच्या दंडाधिकाऱ्यांकडे तात्काळ पाठविल्या जातील. अशा प्रकारे, पासपोर्ट कायदा हा पासपोर्टच्या प्रकरणाशी संबंधित एक विशेष कायदा आहे, तर संहितेच्या कलम १०४ मध्ये न्यायालयासमोर सादर केलेली दस्तऐवज किंवा वस्तू जप्त करण्याचा अधिकार न्यायालयाला देत. जेथे विशिष्ट विषय हाताळणारा विशेष अधिनियम असेल, तेथे विशिष्ट कायद्याशी संबंधित बाबींची तरतूद असलेल्या सामान्य कायद्याऐवजी त्या

कायद्याचा अवलंब करावा कारण पासपोर्ट अधिनियम हा एक विशेष अधिनियम आहे जो अस्तित्वात राहील.

९. 'जप्ती' म्हणजे ताब्यात ठेवणे. 'ऑक्सफर्ड डिक्शनरी' नुसार 'जप्ती' म्हणजे कायदेशीर किंवा औपचारिक ताबा घेणे.

१०. सध्याच्या प्रकरणात, याचिकाकर्त्याचा पासपोर्ट उत्तरवादी प्राधिकरणाच्या ताब्यात आहे.

११. संहितेचे कलम १०४ आणि पासपोर्ट अधिनियमातील कलम १० यांचे एकत्रित वाचन केल्यास, न्यायालयासमोर सादर केलेला कोणतीही दस्तऐवज किंवा सादर केलेली वस्तू अवरुद्ध करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे, तर पासपोर्ट अधिनियमात पासपोर्ट अवरुद्ध करण्याविषयी विशेष उल्लेख आहे.

१२. सध्याच्या प्रकरणात पासपोर्ट अधिनियमाच्या कलम १० अन्वये पासपोर्ट अवरुद्ध करण्यासाठी कोणतीही पावले उचलण्यात आलेली नाहीत.

१३. संहितेच्या कलम १०२ (१) मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे :

> "विवक्षित मालमत्ता जप्त करण्याचा पोलिस अधिकाऱ्याचा अधिकार : (१) जी संपती चोरीला गेल्याचे अभिकथन करण्यात आले असेल किंवा तसा संशय असेल किंवा ज्या परिस्थितीमुले कोणताही गुन्हा घडल्याचा संशय

निर्माण होतो अशा परिस्थितीत जी संपती सापडेल अशी कोणतीही मालमत्ता कोणताही पोलिस अधिकारी जप्त करू शकतो ."

१४. दस्तऐवज जप्त करणे आणि दस्तऐवज अवरुद्ध करणे यात फरक आहे. एका विशिष्ट क्षणी जप्ती केली जाते. ज्याअर्थी, "अवरुद्ध" म्हणजे कायद्यानुसार ताब्यात ठेवण्यासाठी एखाद्या दस्तऐवज किंवा वस्तु ताब्यात घेणे. याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांनी प्रवीण सुरेंद्रन (उपरोल्लेखित) या प्रकरणातील निर्णयावर विश्वास ठेवला आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाने संहितेच्या कलम १०२ आणि १०४ आणि पासपोर्ट अधिनियमाच्या १० मधील तरतुदींचा संदर्भ देऊन या पैलूचा विस्तृतपणे विचार केला आणि असे मानले की पासपोर्ट अधिनियम हा विशेष कायदा आहे आणि हा विशेष कायदा असल्याने तो संहितेच्या कलम १०२ किंवा कलम १०४ वर वरचढ होईल जे पोलिसांना कोणतेही दस्तऐवज जप्त करण्याचा आणि न्यायालयाला अवरुद्ध करण्याचा अधिकार देते. न्यायालयासमोर सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अवरुद्ध करणे पासपोर्ट अवरुद्ध करण्याच्या मर्यादेपर्यंत वाढू शकत नाही. त्यामुळे पासपोर्ट न्यायालयात किंवा पोलिसांसमोर जमा करणे हे दोन्ही कायद्याच्या अधिकाराशिवाय होणार आहेत.

१५. चेन्नूपती क्रांथी कुमार विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य[2] या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने या पैलूचा अधिक विचार केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की सुरेश नंदा विरुद्ध सीबीआय[3] या प्रकरणात गुंतलेल्या मुदयावर या न्यायालयाचा महत्वाचा निर्णय आहे. या निर्णयात असे मानले होते की, पासपोर्ट अवरुद्ध करण्यासाठी संहितेच्या कलम १०४ अंतर्गत अधिकाराचा वापर केला जाऊ शकत नाही. याचे कारण पासपोर्ट जप्त करण्याच्या विशिष्ट विषयाशी निगडित पीपी अधिनियमातील तरतुदी संहितेच्या कलम १०४ पेक्षा वरचढ असतील. तसेच संहितेच्या कलम १०२ (१) अन्वये पासपोर्ट जप्त करण्याचा अधिकार पोलिसांना आहे, पण तो अवरुद्ध करण्याचा अधिकार नाही, असे मत व्यक्त करण्यात आले. कलम १०२ अन्वये पासपोर्ट जप्त करण्याचे अधिकार वापरले तरी पोलिस हे दस्तऐवज रोखून ठेऊ शकत नाहीत आणि ते पासपोर्ट प्राधिकरणाकडे पाठवावेत, असे मत व्यक्त करण्यात आले. त्यानंतर पासपोर्ट अवरुद्ध करायचा की नाही, याचा निर्णय पासपोर्ट प्राधिकरणाने घ्यायचा आहे.

१६. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्थापित कायदेशीर स्थिती आणि निर्णय विचारात घेता, संहितेच्या कलम १०२ किंवा कलम १०४ अंतर्गत पोलिस किंवा फौजदारी न्यायालय पासपोर्ट अवरुद्ध करू शकत नाही. अधिनियमांतर्गत त्यात नमूद

---

2 एआयआर २०२३ एससी ३६३३

3 मॅन्यू/सन्या /७०२० /२००८

केलेले निहित प्राधिकारी पासपोर्ट अवरुद्ध करतात. म्हणूनच, उत्तरवादी प्राधिकरणाने कोणत्याही अधिकारा शिवाय पासपोर्ट ताब्यात ठेवल्यास पासपोर्ट अधिनियमाच्या कलम १० च्या आदेशानुसार कार्य करण्याचे उत्तरवादी प्राधिकरणाचे स्वातंत्र्य राखून पासपोर्ट मुक्त करण्याचा परमादेश जारी करून रिट याचिका मंजूर करने होईल. याचिकाकर्ते आर्थिक गुन्ह्यात गुंतलेले आहेत आणि ते परदेशात जाऊन पळून जाऊ शकतात, ही भीती लक्षात घेऊन याचिकाकर्त्यावर काही अटी लादल्या जाऊ शकतात. म्हणूनच मी खालील आदेश देतो :

**<u>हुकूम</u>**

(१) रिट याचिका मंजूर केली जाते.

(२) उत्तरवादीच्या ताब्यात असलेल्या याचिकाकर्त्याचा पासपोर्ट मुक्त करण्यासाठी उत्तरवादी प्राधिकरणाला परमादेश हुकूम जारी करण्यात येत आहे.

(३) पासपोर्ट अधिनियमांच्या कलम १० च्या आदेशानुसार योग्य ती कारवाई करण्याचे स्वातंत्र्य उत्तरवादी प्राधिकरणाला आहे.

(४) याचिकाकर्त्याचा जेव्हा जेव्हा परदेशात जाण्याचा विचार असेल तेव्हा ते परदेशात प्रवास करण्याचा आणि भारतात परतण्याचा कालावधी, तारखा, तसेच ते ज्या पत्त्यावर जात आहेत त्या पत्याच्या पुराव्यासह स्थानिक पत्ता, तो परदेशात प्रवास करताना वापरू इच्छित असलेला भ्रमणध्वनी क्रमांक आदी तपशील सादर करून

उत्तरवादी प्राधिकरण तसेच विशेष न्यायालयाला कळवतील् आणि परत आल्यावर ते विशेष न्यायालयाला कळवतील.

ही याचिका निकाली काढण्यात आली आहे.

(न्या. उर्मिला जोशी-फाळके)

x-x-x-x-x-x-

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

-x-x-x-x-x-x-